आजचे पंचांग

दिनांक : १२ सप्टेंबर २०२६ वार : शनिवार माह (अमावस्यांत) : भाद्रपद माह (पूर्णिमांत) : भाद्रपद ऋतु : शरद आयन : दक्षिणायन पक्ष : शुक्ल पक्ष तिथी : प्रथम तिथी (सकाळी ०७:४६ पर्यंत) त्यानंतर द्वितीया तिथी नक्षत्र : उत्तरा फाल्गुनी नक्षत्र (दुपारी १२:५४ पर्यंत) त्यानंतर हस्त नक्षत्र योग : शुभ योग (दुपारी ०३:०८ पर्यंत) त्यानंतर शुक्ल योग करण : भाव करण (सकाळी ०७:४६ पर्यंत) त्यानंतर बलवा करण

दैनिक

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार...

### संजीव महाजन, निखील शेट्टी यांच्यासह तिघांवर गुन्हा

**पुणे :** रिअल इस्टेटमध्ये गुंतवणुक केल्यास होणार्या नफ्यात ५० टक्के भागीदारी देण्याचे आमिष दाखवुन व्यावसायिकाकडून १ कोटी ३९ लाख रुपये घेतले. काही महिने परतावा दिल्यानंतर पुढे पैसे देणे बंद केले. व्यावसायिकाने परतावा मागताच अंडरवर्ल्डला सुपारी देऊन जीवे मारून टाकू, खोट्या गुन्ह्यात अडकवुन टाकू अशी धमकी देऊन व्यावसायिकाची १ कोटी १२ लाख रुपयांची फसवणुक केल्याचा प्रकार समोर आला आहे. याबाबत अविनाश भगवान कलवाणी (रा. नॉर्थ सोसायटी, सिझन मॉल मागे, मगरपट्टा, हडपसर) यांनी लष्कर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यावरुन पोलिसांनी संजीव शोरीलाल महाजन आणि आरती संजीव महाजन(दोघे रा. क्रॉस रोड, कॅम्प), निखील करुणाकर शेट्टी (रा. फातिमानगर, वानवडी) यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे.

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | शनिवार, दि. १२ सप्टेंबर २०२६ | वर्ष - १ | अंक - ३४५ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड

## सारांश वृत्त

### रिक्षा चोरीचे दोन गुन्हे उघड, आरोपीकडून दोन रिक्षा जप्त; मुंढवा पोलिसांची कामगिरी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पुणे । प्रतिनिधी

मुंढवा पोलीस ठाण्याच्या तपास पथकाने पेट्रोलिंगदरम्यान संशयित रिक्षाचालकाला ताब्यात घेत केलेल्या चौकशीत रिक्षा चोरीचे दोन गुन्हे उघडकीस आणले. आरोपीकडून सुमारे १ लाख ३० हजार रुपये किमतीच्या दोन रिक्षा जप्त करण्यात आल्या आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मुंढवा पोलीस ठाण्याचे अधिकारी आणि कर्मचारी हद्दीत पेट्रोलिंग करत असताना पोलीस अंमलदार शिवाजी जाधव यांना रिक्षा चालवत जाणारा एक व्यक्ती संशयास्पद वाटला. त्याला थांबवून चौकशी केली असता त्याने आपले नाव सतीश तानाजी देवारे (वय ४०, रा. शिक्षक कॉलनी, भेकराईनगर, हडपसर) असे सांगितले.

रिक्षेबाबत विचारणा केली असता त्याने समाधानकारक उत्तरे न दिल्याने पोलिसांनी त्याला मुंढवा पोलीस ठाण्यात आणून अधिक चौकशी केली. चौकशीत संबंधित रिक्षा घोरपडी परिसरातून चोरी केल्याची कबुली त्याने दिल्याचे पोलिसांनी सांगितले. तपासात ही रिक्षा मुंढवा पोलीस ठाण्यात दाखल गुन्हा क्रमांक २९९/२०२६, भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) मधील चोरीची असल्याचे निष्पन्न झाले. यानंतर आरोपीकडे अधिक चौकशी केली असता आणखी एक रिक्षा चोरी केल्याची माहिती समोर आली. त्या आधारे पोलिसांनी दुसरी रिक्षाही जप्त केली. ही रिक्षा स्वारगेट पोलीस ठाण्यात दाखल गुन्हा क्रमांक १८५/२०२५, भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) शी संबंधित असल्याचे तपासात उघड झाले. अशा प्रकारे मुंढवा पोलिसांनी रिक्षा चोरीचे दोन गुन्हे उघडकीस आणून दोन रिक्षा हस्तगत केल्या आहेत. ही कारवाई अप्पर पोलीस आयुक्त मनोज पाटील, पोलीस उपायुक्त झोन ५ जीवन बेनिवाल, सहायक पोलीस आयुक्त हडपसर विभाग नवगिरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक स्मिता वासनिक आणि पोलीस निरीक्षक (गुन्हे) सागर गोडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईत सहायक पोलीस निरीक्षक गणेश पिंगुवाले, पोलीस उपनिरीक्षक युवराज पोमण, पोलीस अंमलदार शिवाजी जाधव, चेतन गायकवाड, योगेश गायकवाड, राहुल धोत्रे, शिवाजी धांडे, राहुल मोरे, किरण बनसोडे, स्वप्नील रासकर, अक्षय धुमाळ, योगेश राऊत, सलीम अत्तार यांच्यासह मुंढवा पोलीस ठाण्याच्या पथकाने सहभाग घेतला.

# आंदोलनाचा अधिकार कुणी हिरावून घेऊ शकत नाही!

## ‘भारत लोकशाही देश आहे; आंदोलन करणे हा मूलभूत अधिकार’ ` मुंबई उच्च न्यायालयाची महत्त्वपूर्ण भूमिका

■ दैनिक राज्य लोकतंत्र

मुंबई : प्रतिनिधी

सरकारविरोधात आवाज उठवणे, आपल्या मागण्यांसाठी रस्त्यावर उतरणे आणि शांततापूर्ण आंदोलन करणे हा लोकशाहीचा अविभाज्य भाग आहे. नागरिकांच्या या अधिकारावर केवळ प्रशासनाला गैरसोय होते म्हणून गदा आणता येणार नाही, अशी स्पष्ट भूमिका मुंबई उच्च न्यायालयाने घेतली आहे. भारत हा लोकशाही देश आहे आणि आंदोलन करण्याचा अधिकार हा मूलभूत अधिकार आहे. त्यामुळे एखाद्या व्यक्तीला आंदोलन करण्यापासून आम्ही कसे रोखू शकतो? असा सवाल न्यायालयाने केला.



मनोज जरांगे-पाटील यांच्या मुंबई मार्चच्या आवाहनाच्या पार्श्वभूमीवर दाखल याचिकेवर शुक्रवारी मुख्य न्यायमूर्ती महेश चंद्र त्रिपाठी आणि न्यायमूर्ती अद्वैत सेठना यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. यावेळी न्यायालयाच्या निरीक्षणामुळे लोकशाही व्यवस्थेत नागरिकांच्या निषेधाच्या अधिकाराला महत्त्वपूर्ण न्यायालयीन अधोरेखा मिळाली.

लोकशाही केवळ निवडणुका घेण्यापुरती मर्यादित नसते. सत्ताधाऱ्यांच्या निर्णयांवर प्रश्न उपस्थित करणे, असहमती व्यक्त करणे आणि आपल्या मागण्यांसाठी संघटित होणे हीदेखील लोकशाहीचीच प्रक्रिया आहे. त्यामुळे ‘आंदोलन होणार आहे’ एवढ्याच कारणावरून नागरिकांना रोखणे योग्य ठरेल का, हा मूलभूत प्रश्न या सुनावणीच्या निमित्ताने पुन्हा ऐरणीवर आला आहे.

मात्र, आंदोलनाचा अधिकार निरंकुश नाही. शांततापूर्ण आंदोलन करताना सार्वजनिक सुव्यवस्था, वाहतूक आणि सामान्य नागरिकांचे दैनंदिन जीवन यांच्यावर अनावश्यक परिणाम होऊ नये, ही जबाबदारी आंदोलकांवरही आहे. त्याचवेळी प्रशासनाने कायदा-सुव्यवस्था राखण्याच्या नावाखाली नागरिकांचा निषेधाचा अधिकारच संपुष्टात आणू नये, ही लोकशाहीची दुसरी बाजू आहे.

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे-पाटील यांच्या नेतृत्वाखाली यापूर्वी मोठी आंदोलने झाली आहेत. आता मुंबईकडे मोर्चाच्या आवाहनामुळे प्रशासनासमोर वाहतूक, सुरक्षा आणि कायदा-सुव्यवस्थेचे आव्हान निर्माण झाले आहे. मात्र, त्या आव्हानांवर उपाय म्हणून आंदोलन रोखणे नव्हे, तर आंदोलनासाठी कायदेशीर आणि शिस्तबद्ध व्यवस्था निर्माण करणे, हा लोकशाही मार्ग ठरतो.

या प्रकरणातील न्यायालयीन भूमिकेचा व्यापक अर्थ त्यामुळे महत्त्वाचा आहे. सत्तेला प्रश्न विचारणारा आवाज गैरसोयीचा वाटला म्हणून तो दाबता येत नाही. आंदोलनामुळे प्रशासनाची परीक्षा होते; पण आंदोलन दडपले तर लोकशाहीचीच परीक्षा सुरू होते.

नागरिकांचा निषेधाचा अधिकार आणि सार्वजनिक सुव्यवस्था यांच्यात संतुलन राखण्याची जबाबदारी आता प्रशासनाची आहे. कारण जिवंत लोकशाहीची खरी ओळख सत्तेच्या जयघोषात नसते; तर सत्तेविरोधातही निर्भयपणे आवाज उठवता येतो की नाही, यात असते.

## पुढील दोन वर्षांत जालना जिल्ह्यातील ५०० जि.प. शाळांचा दर्जेदार विकास

■ दैनिक राज्य लोकतंत्र

मुंबई : प्रतिनिधी

जालना जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांचा शैक्षणिक व भौतिक दर्जा उंचावण्यासाठी पुढील दोन वर्षांत ५०० शाळांचा सर्वांगीण विकास करण्याचे नियोजन करा, असे निर्देश राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री पंकजा मुंडे यांनी दिले. ‘नवीन वर्षात नवी शाळा’ या संकल्पनेतून राज्यासाठी आदर्श ठरेल, अशा गुणवत्तेचे काम करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

मंत्रालयात शुक्रवारी झालेल्या आढावा बैठकीत पालकमंत्री मुंडे यांनी जालना जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांच्या विकासकामांचा आढावा घेतला. जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी शिरीष बनसोडे, मनपा आयुक्त अंजली शर्मा यांच्यासह विविध अधिकारी दूरदृश्यप्रणालीद्वारे सहभागी झाले.

यापूर्वी १ सप्टेंबर रोजी झालेल्या बैठकीत शाळांचे सर्वेक्षण करून अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले होते. त्या अहवालाच्या आधारे शाळांच्या विकासासाठी सर्वसमावेशक आराखडा तयार करण्याच्या सूचना यावेळी देण्यात आल्या. शाळा व अंगणवाड्यांच्या विकासासाठी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून उपलब्ध निधीचे काटेकोर आणि परिणामकारक नियोजन करावे. विद्यार्थ्यांसाठी आवश्यक शैक्षणिक सुविधा, पायाभूत सुविधा, आकर्षक रंगरंगोटी आणि स्वच्छ व सुंदर परिसर निर्माण करण्यावर भर द्यावा. विकासकामांचा दर्जा कोणत्याही परिस्थितीत कमी होता कामा नये, असेही त्यांनी स्पष्ट केले. जालना जिल्ह्यात विकसित होणाऱ्या आदर्श शाळांचे अनुकरण राज्यातील तसेच इतर राज्यांतील शाळांनी करावे, अशा दर्जाचे काम करण्याचे आवाहन त्यांनी केले. ‘नवीन वर्षात नवी शाळा’ हे अभियान स्वरूपात राबवून विकासकामांना गती द्यावी. पुढील आढावा बैठक जालना येथे प्रत्यक्ष घेणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

जिल्ह्यातील नावीन्यपूर्ण योजनांचाही त्यांनी आढावा घेतला. मंजूर कामे निर्धारित वेळेत, गुणवत्तापूर्ण पद्धतीने पूर्ण करून निधीचा वेळेत विनियोग करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या.

## एमपीएससी सचिवांना काळे फासल्याने वाद संभाजी ब्रिगेडवर कारवाईचा गृहराज्यमंत्री योगेश कदम यांचा इशारा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

मुंबई : प्रतिनिधी

एमपीएससीच्या पेपरफुटीच्या आरोपांवरून राज्यातील विद्यार्थ्यांमध्ये संतापाचे वातावरण असतानाच नवी मुंबईतील एमपीएससी कार्यालयात संभाजी ब्रिगेडच्या कार्यकर्त्यांनी सचिवांना काळे फासल्याची घटना घडली. या प्रकारानंतर गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी संबंधितांवर कारवाई करण्याचा इशारा दिला आहे.

पेपरफुटीच्या निषेधार्थ पुण्यात विद्यार्थ्यांनी मोर्चा काढला होता. या आंदोलनात विरोधी पक्षातील नेतेही सहभागी झाले होते. पेपरफुटीप्रकरणी दोषींवर कठोर कारवाई करावी आणि एमपीएससी अध्यक्षांचा राजीनामा घ्यावा, अशी मागणी आंदोलकांनी केली होती. सरकारनेही दोषींवर कारवाई करण्याचे आश्वासन दिले आहे.

या पार्श्वभूमीवर एमपीएससी सचिवांच्या कार्यालयात घुसून काळे फासण्याच्या प्रकारावर कदम यांनी नाराजी व्यक्त केली. प्रसिद्धीसाठी अशा प्रकारचे आंदोलन करून प्रश्न सुटणार नाहीत. एमपीएससी प्रकरण सरकारने गांभीर्याने घेतले असून दोषी आढळणाऱ्यांवर कारवाई केली जाईल. मात्र, अशा आंदोलनांमुळे कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही, याचीही खबरदारी घेतली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, धाराशिवमध्ये कदम यांचा ताफा मराठा आंदोलकांनी अडवला. मनोज जरांगे यांच्या उपोषणाकडे सरकारचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करत आंदोलकांनी घोषणाबाजी केली. तसेच एकनाथ शिंदे यांच्याबाबत कदम यांनी केलेल्या वक्तव्यावरूनही त्यांनी जाब विचारला. दुसरीकडे, संभाजी ब्रिगेडचे प्रवक्ते संतोष शिंदे यांनी या कृतीचे समर्थन केले. एमपीएससीचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या आणि जनतेच्या रोषाचे हे प्रतीक असल्याचा दावा करत, सचिवांना काळे फासणे ही सरकारच्या कथित अपयशाविरोधातील थप्पड असल्याची प्रतिक्रिया त्यांनी दिली.

## कोणत्याच राजकीय पक्षांमध्ये अंतर्गत लोकशाही राहिली नाही! पृथ्वीराज चव्हाण यांचे वक्तव्य; प्रभावी पक्षांतरबंदी कायद्याची मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पुणे : प्रतिनिधी

देशातील सध्याच्या राजकीय परिस्थितीवर भाष्य करताना माजी मुख्यमंत्री तथा काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी लोकशाही व्यवस्थेच्या सद्यस्थितीवर गंभीर प्रश्न उपस्थित केले. आज जे काही चालले आहे, त्याला लोकशाही म्हणायला फार मोठे धाडस लागेल. पैशांचा गैरवापर सुरू असताना त्याला लोकशाही म्हणता येईल का? असा सवाल त्यांनी केला. देशातील कोणत्याही राजकीय पक्षात आता अंतर्गत लोकशाही शिल्लक राहिलेली नाही, असेही ते म्हणाले.

संविधानाने देशाला लोकशाही व्यवस्था दिली असली तरी ती राबविणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांची प्रामाणिकता तितकीच महत्त्वाची आहे, असे चव्हाण यांनी नमूद केले. संविधान कितीही चांगले असले, तरी ते अप्रामाणिक लोकांच्या हातात गेल्यास अपेक्षित परिणाम साधता येणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला.

पक्षांतराच्या मुद्द्यावर त्यांनी राजीव गांधी यांच्या काळात लागू करण्यात आलेल्या पक्षांतरबंदी कायद्याचा संदर्भ दिला. २००३ मध्ये कायद्यात करण्यात आलेल्या बदलांनंतर पक्षांतर थांबण्याऐवजी परिस्थिती अधिक गुंतागुंतीची झाल्याचा दावा त्यांनी केला. महाराष्ट्रातील राजकीय घडामोडींच्या पार्श्वभूमीवर विद्यमान पक्षांतरबंदी कायदा प्रभावी ठरत नसल्याचे त्यांनी सांगितले. सध्याचा कायदा रद्द करून अधिक सोपा आणि कठोर कायदा करण्याची मागणी त्यांनी केली. पक्षाच्या भूमिकेविरोधात मतदान करणाऱ्या लोकप्रतिनिधींचे पद तत्काळ रद्द होईल, अशी स्पष्ट तरतूद असावी, अशी भूमिका त्यांनी मांडली. न्यायव्यवस्था आणि निवडणूक आयोगासारख्या संस्थांच्या स्वायत्ततेबाबतही त्यांनी चिंता व्यक्त केली. तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये महाविकास आघाडी आणि महायुतीच्या उमेदवारांकडून मतदारांना पैसे वाटल्याचा दावा करत, जिंकण्यासाठी मतदाराला पाच-पाच लाख रुपये दिले, असा आरोप त्यांनी केला. या वक्तव्यामुळे निवडणूक प्रक्रियेतील पैशांच्या वापराचा मुद्दा पुन्हा चर्चेत आला आहे.

# न्यायालयाचे निर्देश केंद्र सरकार ऐकणार का?

## ई-रिक्षांसाठी देशभरात समान धोरणाचा आदेश; ६० दिवसांत नियमावलीचे निर्देश

■ दैनिक राज्य लोकतंत्र

भोपाळ : प्रतिनिधी

देशभरात ई-रिक्षांची संख्या वाढत असताना वाहतूक कोंडी आणि नियमनाच्या प्रश्नावर मध्य प्रदेश उच्च न्यायालयाने केंद्र सरकारला महत्त्वपूर्ण निर्देश दिले आहेत. ई-रिक्षांच्या संचालनासाठी देशव्यापी धोरण तयार करून ते ६० दिवसांत जारी करण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत. आता खरा प्रश्न असा एका राज्यातील उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने दिलेले हे निर्देश केंद्र सरकार कितपत गांभीर्याने आणि किती वेगाने अंमलात आणणार?

न्यायमूर्ती विवेक अग्रवाल आणि न्यायमूर्ती अवनींद्र कुमार सिंह यांच्या खंडपीठाने जनहित याचिकेवर सुनावणी करताना ही भूमिका घेतली. ई-रिक्षांच्या अनियंत्रित वापरामुळे अनेक ठिकाणी वाहतूक व्यवस्थेवर परिणाम होत असल्याचा दावा याचिकेत करण्यात आला होता.



ई-रिक्षा ही सामान्य नागरिकांसाठी तुलनेने स्वस्त आणि सहज उपलब्ध वाहतूक व्यवस्था आहे. त्यामुळे त्यांच्या संख्येवर केवळ निर्बंध लादणे हा प्रश्नाचा संपूर्ण उपाय ठरू शकत नाही. मात्र, परवाने, मार्ग, पार्किंग, थांबे, वाहतूक शिस्त आणि सार्वजनिक रस्त्यांचा वापर याबाबत स्पष्ट नियम नसतील, तर स्वस्त वाहतुकीचे साधनच शहरांसाठी वाहतूक समस्येचे कारण बनू शकते.

यामुळे न्यायालयाने केंद्राला देशभरासाठी समान धोरण तयार करण्याचे निर्देश दिले आहेत. मात्र, न्यायालयांनी वारंवार प्रशासनाला धोरणे तयार करण्याचे निर्देश द्यावे लागणे, हा धोरणकर्त्यांच्या कार्यक्षमतेवरच प्रश्नचिन्ह नाही का? न्यायालयीन आदेशानंतरच केंद्राला नियमावलीची तातडी जाणवणार असेल, तर प्रशासकीय यंत्रणा नेमकी काय करत होती, असाही सवाल उपस्थित होतो.

६० दिवसांची मुदत आता केंद्र सरकारसमोर स्पष्ट आहे. या मुदतीत केवळ कागदावरील नियमावली तयार होते की ई-रिक्षांच्या प्रत्यक्ष संचालनाला शिस्त लावणारे प्रभावी धोरण येते, याकडे देशाचे लक्ष राहणार आहे.

न्यायालयाने दिशा दाखवली आहे; आता केंद्र सरकार त्या दिशेने पावले उचलणार की पुन्हा फाईलींच्या ढिगाऱ्यात हा आदेश हरवणार, हेच पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# १२ दिवसांची दारूबंदी; सरकारच्या निर्णयाला न्यायालयाची चपराक!

## ‘मद्यपान म्हणजे कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न’ असे सरसकट गृहित कसे? : मुंबई उच्च न्यायालयाचा सवाल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

मुंबई : प्रतिनिधी

गणेशोत्सवाच्या काळात कायदा-सुव्यवस्था राखण्याच्या नावाखाली पुण्यात सलग १२ दिवस दारूविक्री बंद करण्याचा राज्य सरकारचा निर्णय आता न्यायालयाच्या कसोटीवर आला आहे. एवढ्या प्रदीर्घ कालावधीची सरसकट दारूबंदी करणे अविवेकी असल्याचे निरीक्षण मुंबई उच्च न्यायालयाने नोंदवले असून, सरकारच्या निर्णयामागील तर्कावरच प्रश्नचिन्ह उभे केले आहे.

मुख्य न्यायमूर्ती महेश चंद्र त्रिपाठी आणि न्यायमूर्ती अद्वैत सेठना यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली. गणेशोत्सवात एखादी व्यक्ती मद्यपान करून उत्सव साजरा करते म्हणून त्यातून आपोआप कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल, असे गृहित धरता येणार नाही, अशी महत्त्वपूर्ण टिप्पणी न्यायालयाने केली.

यामुळे सरकारसमोर साधा प्रश्न उभा राहतो कायदा-सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी असताना संपूर्ण १२ दिवस दारूची दुकाने बंद करणे हाच प्रशासनाकडे उपलब्ध असलेला सर्वात सोपा उपाय आहे का?

गणेशोत्सवात पुण्यात मोठ्या प्रमाणावर गर्दी होते, मिरवणुका निघतात, वाहतूक वाढते आणि पोलिसांवर मोठा ताण येतो. त्यामुळे सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना करण्याची गरज निश्चितच आहे. मात्र, गर्दीचे नियोजन, वाहतूक नियंत्रण, संवेदनशील ठिकाणी अतिरिक्त बंदोबस्त, मद्यपान करून गोंधळ घालणाऱ्यांवर तातडीची कारवाई अशा लक्षित उपायांऐवजी सर्व नागरिकांवर सरसकट निर्बंध लादणे कितपत विवेकी आहे, हा न्यायालयीन निरीक्षणाचा गाभा आहे.

न्यायालयाने आणखी एक महत्त्वाचा मुद्दा उपस्थित केला. नियमित मद्यपान करणाऱ्या व्यक्तींना अचानक मद्य उपलब्ध न झाल्यास आरोग्यविषयक गुंतागुंत निर्माण होऊ शकते आणि अशा रुग्णांची संख्या रुग्णालयांत वाढण्याची शक्यता आहे. म्हणजेच, कायदा-सुव्यवस्था सुधारण्याच्या उद्देशाने घेतलेला निर्णय उलट आरोग्यव्यवस्थेवर अतिरिक्त भार निर्माण करू शकतो, याचाही सरकारने विचार केला आहे का?

सरकारचा निर्णय नेमक्या कोणत्या आकडेवारीवर आणि कोणत्या ठोस धोक्याच्या मूल्यांकनावर आधारित होता? गणेशोत्सवातील मागील घटनांचे विश्लेषण करून १२ दिवसांची बंदी आवश्यक असल्याचे सिद्ध झाले आहे का? की उत्सव म्हटला की दारूबंदी हा प्रशासनाचा ठरलेला ‘फॉर्म्युला’ झाला आहे?

दारूविक्रीला परवानगी देणे हा प्रश्न नाही; प्रश्न आहे तो निर्बंध किती, कुठे आणि कोणत्या कारणासाठी? एखाद्या व्यक्तीच्या संभाव्य गैरवर्तनासाठी संपूर्ण शहरातील नागरिकांना दीर्घकाळ सामूहिक शिक्षा देणे योग्य ठरेल का, हा व्यापक प्रशासकीय प्रश्न या प्रकरणातून समोर आला आहे.

गणेशोत्सव हा धार्मिकतेसोबतच महाराष्ट्राच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनाचा मोठा भाग आहे. त्यामुळे उत्सव शांततेत पार पाडणे ही सरकारची जबाबदारी आहे. पण शांतता निर्माण करण्यासाठी विवेकपूर्ण नियोजन हवे की निर्बंधांची भिंत? हा प्रश्न सरकारला स्वतःला विचारावा लागणार आहे.

मुंबई उच्च न्यायालयाच्या निरीक्षणामुळे १२ दिवसांच्या दारूबंदीचा निर्णय केवळ दारूविक्रीचा विषय राहिलेला नाही. तो प्रशासन नागरिकांच्या स्वातंत्र्यावर निर्बंध घालताना किती कारणमीमांसा आणि प्रमाणबद्धता दाखवते, या मूलभूत प्रश्नाशी जोडला गेला आहे.

## संपादकीय

### एमपीएससीच्या विश्वासाला लागलेली गळती!

पेपरफुटी, परीक्षांचे वारंवार पुढे ढकलणे, अध्यक्षांवरील आरोप आणि विद्यार्थ्यांचा वाढता असंतोष; एसआयटी हा शेवट नसून सरकारच्या जबाबदारीची सुरुवात आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोग म्हणजे केवळ परीक्षा घेणारी यंत्रणा नव्हे; राज्याच्या प्रशासनात गुणवत्तेच्या आधारे प्रवेश मिळण्याचा तो विश्वासाचा मार्ग आहे. त्यामुळे प्रश्नपत्रिका फुटणे, परीक्षा रद्द होणे आणि तारखा वारंवार बदलणे या घटना केवळ प्रशासकीय चुका म्हणून झटकून टाकता येणार नाहीत. त्या संपूर्ण भरती प्रक्रियेच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करतात.

ऑगस्टमध्ये औषध निरीक्षक आणि गट–ब भरतीची प्रश्नपत्रिका फुटल्याच्या प्रकरणानंतर परीक्षा रद्द करण्यात आली. त्यानंतर पुण्यात हजारो उमेदवार रस्त्यावर उतरले. अध्यक्ष विवेक भिमनवार यांच्या राजीनाम्यापासून प्रश्नपत्रिकेच्या फॉरेन्सिक तपासणीपर्यंत अनेक मागण्या विद्यार्थ्यांनी केल्या. सरकारकडून आश्वासने मिळाली, बैठका झाल्या; मात्र विद्यार्थ्यांचा असंतोष कमी झालेला नाही. कारण आता प्रश्न एका परीक्षेचा राहिलेला नाही, तर संपूर्ण व्यवस्थेवरचा विश्वास डळमळीत झाला आहे.

त्यातच गट–क संयुक्त पूर्व परीक्षेची तारीख पुन्हा पुढे ढकलण्यात आली आहे. १२ जुलै, त्यानंतर २७ सप्टेंबर, २५ ऑक्टोबर आणि आता ३ जानेवारी २०२७ अशी तारीख बदलत गेली. परीक्षा कधी होणार, निकाल कधी लागणार आणि नियुक्ती कधी होणार, या अनिश्चिततेत हजारो उमेदवारांचे वर्षानुवर्षांचे नियोजन अडकले आहे. परीक्षा पुढे ढकलण्याचे प्रशासकीय कारण काहीही असो; प्रत्येक बदलामुळे उमेदवारांचा वेळ, पैसा आणि मानसिक ऊर्जा खर्च होते.

या पार्श्वभूमीवर आमदार रोहित पवार यांनी ११ सप्टेंबरला पत्रकार परिषदेत ३४ पानी सादरीकरण करत भिमनवार यांच्या यापूर्वीच्या परिवहन आयुक्तपदाच्या कार्यकाळाबाबत विविध आरोप केले. एचएसआरपी क्रमांक प्लेट, वाहन इंटरसेप्टर, जीपीआरएस किट तसेच पदोन्नतीशी संबंधित मुद्दे त्यांनी उपस्थित केले. हे आरोप आहेत; त्यांची स्वतंत्र चौकशी होणे आवश्यक आहे. भिमनवार यांनी हे आरोप राजकीय हेतूने प्रेरित असल्याचे सांगत त्यांचा इन्कार केला असून प्रश्नपत्रिका फुटण्याची घटना आपल्या अध्यक्षपदाच्या आधीची असल्याचे म्हटले आहे.

मात्र इथे व्यक्तीपेक्षा व्यवस्था महत्त्वाची आहे. आरोप खरे की खोटे, हे तपासातून स्पष्ट होईल. पण तपासच झाला नाही, तर संशय कायम राहणार. म्हणूनच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी २०२५च्या गट–ब आणि गट–क परीक्षांमधील पेपरफुटी व अनियमिततेची एसआयटी चौकशी जाहीर केली आहे. उत्तरपत्रिकांची फेरतपासणी, मुलाखती पुढे ढकलणे आणि परीक्षा प्रक्रियेत सुधारणा सुचवण्यासाठी समिती नेमणे, असे निर्णयही घेण्यात आले आहेत. अध्यक्षांच्या राजीनाम्याची मागणी मात्र ठोस पुरावा नसल्याने सरकारने स्वीकारलेली नाही.

एसआयटी नेमणे हा निर्णय स्वागतार्ह आहे; पण तोच अंतिम उपाय समजण्याची घाई सरकारने करू नये. चौकशीचा अहवाल येईपर्यंत प्रश्न अनुत्तरितच राहतील. दोषी कोण, प्रश्नपत्रिका कुठे फुटली, माहिती कुणाकडे पोहोचली, आर्थिक व्यवहार झाले का आणि या प्रक्रियेत कोणकोणत्या पातळीवर निष्काळजीपणा झाला, याचा माग काढणे आवश्यक आहे. केवळ काही कर्मचाऱ्यांवर कारवाई करून प्रकरण संपवणे म्हणजे व्यवस्थेतील छिद्र तसेच ठेवणे होईल.

पेपरफुटीच्या कथित प्रकरणात कोट्यवधी रुपयांच्या उलाढालीचे आरोप झाले आहेत. असे आरोप असतील तर तपास फक्त प्रश्नपत्रिकेपुरता मर्यादित न राहता आर्थिक व्यवहारांपर्यंत पोहोचला पाहिजे. पैसा कोणाकडून आला, कुठे गेला आणि त्यामागे कोणाचे हितसंबंध होते, याचा मागोवा घेतल्याशिवाय पेपरफुटीची साखळी उलगडणार नाही.

एमपीएससीच्या परीक्षा पारदर्शक असणे ही केवळ आयोगाची जबाबदारी नाही. सरकारनेही त्यासाठी कठोर सुरक्षा व्यवस्था, तांत्रिक नियंत्रण, जबाबदारी निश्चित करणारी यंत्रणा आणि उमेदवारांच्या तक्रारींचे तातडीने निराकरण करणारी व्यवस्था उभी करणे गरजेचे आहे. समित्या, चौकशा आणि आश्वासने यापेक्षा महत्त्वाचे आहे ते म्हणजे दोषींपर्यंत पोहोचणारी कारवाई आणि भविष्यात अशी घटना पुन्हा घडणार नाही याची हमी.

कारण एमपीएससीच्या प्रश्नपत्रिकेची गळती ही कागदाची गळती नाही; ती विश्वासाची गळती आहे. आणि हा विश्वास परत मिळवण्यासाठी केवळ परीक्षा घेणे पुरेसे नाही. परीक्षा व्यवस्थेची विश्वासार्हता पुन्हा सिद्ध करावी लागेल. एसआयटी हा उत्तराचा शेवट नाही; तो उत्तर शोधण्याची सुरुवात आहे.

## विसर्जन घाटांवरील सुरक्षा–सुविधांची महापौर रवि लांडगे यांच्याकडून पाहणी

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**
**पिंपरी-चिंचवड : प्रतिनिधी**

गणेश विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर पिंपरी–चिंचवड महापालिकेने शहरातील प्रमुख विसर्जन घाटांवर केलेल्या स्वच्छता, सुरक्षा आणि नागरिकांच्या सुविधांची महापौर रवि लांडगे यांनी पाहणी केली. विसर्जनाच्या दिवशी भाविकांची गैरसोय होऊ नये, यासाठी सर्व सुविधा वेळेत पूर्ण करून मनुष्यबळ आणि यंत्रणा सज्ज ठेवण्याच्या सूचना त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

गणेश विसर्जन सुरक्षित, शिस्तबद्ध आणि पर्यावरणपूरक पद्धतीने पार पडावे, यासाठी महापालिकेची यंत्रणा सज्ज ठेवण्याचे निर्देश देताना महापौरांनी घाटांवरील स्वच्छता, प्रकाश व्यवस्था, पिण्याचे पाणी, निर्माल्य संकलन, दिशादर्शक फलक, कृत्रिम विसर्जन हौद आणि सुरक्षा व्यवस्था काटेकोरपणे कार्यान्वित ठेवण्यास सांगितले.

गर्दीच्या पार्श्वभूमीवर घाटांवरील प्रवेश व बाहेर पडण्याचे मार्ग सुकर ठेवावेत. चिखल, घसरडेपणा किंवा पाणी साचणार नाही, याची दक्षता घ्यावी. महिला, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. घाट परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी अतिरिक्त मनुष्यबळ तैनात करावे, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

**निर्माल्य नदीपात्रात जाणार नाही, याची दक्षता**

निर्माल्य नदीपात्रात किंवा जलस्रोतांमध्ये जाणार नाही, यासाठी निर्माल्यकुंडांची योग्य ठिकाणी व्यवस्था करावी आणि त्याबाबत स्पष्ट दिशादर्शक फलक लावावेत, असे महापौरांनी सांगितले. विसर्जनस्थळी निर्माण होणारा कचरा तातडीने संकलित करून त्याची योग्य विल्हेवाट लावण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

लहान गणेशमूर्तींचे विसर्जन कृत्रिम विसर्जन हौदांमध्ये करावे. शाडू मातीच्या मूर्तींचे शक्यतो घरीच स्वच्छ पाण्यात विसर्जन करावे. नदी, नाले आणि इतर जलस्रोतांचे प्रदूषण टाळण्यासाठी नागरिकांनी पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करावा, असे आवाहन महापौर रवि लांडगे यांनी केले.



विसर्जन घाटांवरील सुरक्षेत कोणतीही तडजोड करू नये, आवश्यकतेनुसार सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित ठेवावी, जीवनरक्षक, अग्निशमन दल आणि आपत्ती व्यवस्थापन पथके सज्ज ठेवावीत, तसेच मध्यवर्ती नियंत्रण कक्षाशी सातत्याने समन्वय राखावा, असेही त्यांनी निर्देशित केले.

**विभागीय समन्वयावर आयुक्तांचा भर**

महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी सर्व संबंधित विभागांनी परस्पर समन्वयाने काम करण्याच्या सूचना दिल्या. कृत्रिम विसर्जन हौदांची स्वच्छता, डागडुजी, प्रकाशयोजना आणि सुरक्षा व्यवस्था पूर्ण क्षमतेने कार्यरत ठेवावी. विद्युत तारा, जोडण्या व उपकरणांची सुरक्षितता तपासून कोणतीही धोकादायक परिस्थिती निर्माण होणार नाही, याची दक्षता घ्यावी, असे त्यांनी सांगितले.

प्रत्येक क्षेत्रीय अधिकाऱ्याने आपल्या कार्यक्षेत्रातील विसर्जनस्थळांची प्रत्यक्ष पाहणी करून आवश्यक सुविधा उपलब्ध असल्याची खात्री करावी. विसर्जन मार्ग, घाट परिसर आणि सार्वजनिक ठिकाणी सातत्याने स्वच्छता राखावी. भाविकांना अडचण निर्माण झाल्यास संबंधित यंत्रणांनी तातडीने समन्वय साधून कार्यवाही करावी, असे आयुक्तांनी स्पष्ट केले.

**प्रमुख विसर्जनस्थळांची पाहणी**

महापौर रवि लांडगे आणि आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी अधिकाऱ्यांसमवेत सुभाष घाट, पिंपरी, अहिल्यादेवी होळकर घाट, वेताळ महाराज घाट, सांगवी, वाकड गावठाण घाट, चिंचवड येथील थेरगाव पूल घाट, जाधववाडी घाट, रावेत, इंद्रायणी नदी घाट आणि मोशी खाण आदी प्रमुख विसर्जनस्थळांची पाहणी केली.

यावेळी विविध क्षेत्रीय प्रभागांच्या अध्यक्षा व नगरसदस्यांसह अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, तृप्ती सांडभोर, विक्रांत बगाडे, उपआयुक्त अण्णा बोदडे, डॉ. प्रदीप ठेंगल, व्यंकटेश दुर्वास, सहायक आयुक्त तानाजी नरळे, सहशहर अभियंता अनिल भालसाखळे, महेश कावळे, क्षेत्रीय अधिकारी अश्विनी गायकवाड, परशुराम वाघमोडे, गोरक्षनाथ लिम्हण, अजिंक्य येळे, कार्यकारी अभियंता सोहम निकम, जहिरा मोमीन, विशेष अधिकारी किरण गायकवाड, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, मुख्य उद्यान अधीक्षक महेश गारगोटे यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी, कर्मचारी आणि सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

## पिंपरी-चिंचवडमध्ये अनधिकृत बांधकामे, अतिक्रमणांवर महापालिकेची धडक कारवाई

### ८३ हजार चौरस फुटांहून अधिक क्षेत्र अतिक्रमणमुक्त; दहा क्षेत्रीय कार्यालयांच्या हद्दीत कारवाई

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**
**पिंपरी-चिंचवड : प्रतिनिधी**

पिंपरी–चिंचवड शहरातील अनधिकृत बांधकामे आणि अतिक्रमणांविरोधात महापालिका प्रशासनाने धडक कारवाई केली. आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या आदेशानुसार तसेच अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर आणि अतिक्रमण मुख्य कार्यालयाचे उपआयुक्त अतुल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील सर्व दहा क्षेत्रीय कार्यालयांच्या हद्दीत करण्यात आलेल्या कारवाईत सुमारे ८३ हजार ९९ चौरस फूट क्षेत्रावरील अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणे निष्कासित करण्यात आली.



या कारवाईत आरसीसी स्वरूपाची अनधिकृत बांधकामे, पत्राशेड, नव्याने सुरू असलेली बांधकामे, तसेच पदपथावरील टपऱ्या, हातगाडे आणि इतर अतिक्रमणांचा समावेश होता.

**फ क्षेत्रीय कार्यालयात सर्वाधिक कारवाई**

अ क्षेत्रीय कार्यालयाच्या साईनगर, निगडी परिसरात सुमारे ३ हजार ४९८ चौरस फूट क्षेत्रावर कारवाई करण्यात आली. ब क्षेत्रीय कार्यालयाच्या शगुन चौक, पिंपरी मार्केट, एम्पायर ब्रिजखाली चिंचवड आणि वाल्हेकरवाडी परिसरात १० हजार ५३८ चौरस फूट क्षेत्र अतिक्रमणमुक्त करण्यात आले. क क्षेत्रीय कार्यालयाच्या चिखली, कुदळवाडी, शिवरोड, रवी रंजन वजन काटा आणि डी–मार्ट शेजारी चिंचवड परिसरात १२ हजार ७२३ चौरस फूट क्षेत्रावर कारवाई झाली. ड क्षेत्रीय कार्यालयात ५ हजार ४००, तर ई क्षेत्रीय कार्यालयाच्या भोसरी व मोशी परिसरात ७ हजार ९६५ चौरस फूट क्षेत्रावर कारवाई करण्यात आली. फ क्षेत्रीय कार्यालयाच्या मोरे वस्ती, चिखली, तळवडे आणि नेवाळे वस्ती परिसरात सर्वाधिक १९ हजार ४०० चौरस फूट क्षेत्रावरील अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणे हटविण्यात आली. ग क्षेत्रीय कार्यालयाच्या राजवाडेनगर, गोकुळवाडी, पवनानगर, स्वप्ननगरी कॉलनी, काळेवाडी, डोंगरे कॉर्नर, मंगलनगर आणि थेरगाव परिसरात १३ हजार ३५ चौरस फूट क्षेत्रावर कारवाई झाली. याशिवाय ह क्षेत्रीय कार्यालयाच्या जुनी सांगवी परिसरात १ हजार ८६, ज क्षेत्रीय कार्यालयाच्या वाल्हेकरवाडी, दत्त मंदिर रोड वाकड, पिंपळे निलख आणि किवळे परिसरात ६ हजार २८, तर ल क्षेत्रीय कार्यालयाच्या भोसरी, इंद्रायणीनगर, संत तुकारामनगर आणि पिंपरी परिसरात ३ हजार ४२६ चौरस फूट क्षेत्रावर कारवाई करण्यात आली. या कारवाईत उपअभियंते, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक, बीट निरीक्षक, २१८ एमएसएफ जवान, पोलीस अधिकारी व कर्मचारी तसेच महापालिका मजूर सहभागी झाले.

> पिंपरी–चिंचवड शहरातील सार्वजनिक जागा, रस्ते व पदपथ अतिक्रमणमुक्त ठेवणे तसेच अनधिकृत बांधकामांना प्रतिबंध करणे ही महापालिका प्रशासनाची सातत्यपूर्ण जबाबदारी आहे. नागरिकांनी अनधिकृत बांधकामे अथवा अतिक्रमणे करू नयेत. नियमांचे उल्लंघन झाल्यास संबंधितांवर नियमानुसार कारवाई करण्यात येईल. शहराचे नियोजनबद्ध व शिस्तबद्ध स्वरूप कायम ठेवण्यासाठी क्षेत्रनिहाय नियमित कारवाई सुरू राहणार आहे.
> **- डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका**

शहरातील सार्वजनिक जागा, रस्ते आणि पदपथ अतिक्रमणमुक्त ठेवण्यासाठी तसेच अनधिकृत बांधकामांना आळा घालण्यासाठी यापुढेही आवश्यकतेनुसार नियमित कारवाई करण्यात येणार असल्याचे महापालिका प्रशासनाने स्पष्ट केले.

## ५७ हजार विद्यार्थ्यांच्या शालेय पोषण आहार व्यवस्थेला बळ

### अन्नामृत फाउंडेशनच्या अद्ययावत केंद्रीय स्वयंपाकगृहाचे उद्घाटन; सुमारे ३०० शाळांतील विद्यार्थ्यांना मिळणार स्वच्छ, सुरक्षित व पौष्टिक आहार

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**
**पिंपरी-चिंचवड : प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांचे आरोग्य, पोषण आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण यांना केंद्रस्थानी ठेवून पिंपरी–चिंचवड महानगरपालिका आणि अन्नामृत फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने नूतनीकरण व आधुनिकीकरण करण्यात आलेल्या शालेय पोषण आहाराच्या केंद्रीय स्वयंपाकगृहाचे उद्घाटन करण्यात आले. या सुविधेमुळे महापालिका क्षेत्रातील सुमारे ३०० शाळांमधील ५७ हजार विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणारी पोषण आहार व्यवस्था अधिक सक्षम होणार आहे.

अन्नामृत फाउंडेशनच्या माध्यमातून महापालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना नियमित शालेय पोषण आहार दिला जातो. आहाराची गुणवत्ता, स्वच्छता, सुरक्षितता आणि पोषणमूल्ये लक्षात घेऊन केंद्रीय स्वयंपाकगृह आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने अद्ययावत करण्यात आले आहे. आहार तयार करण्यापासून विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यापर्यंतच्या प्रक्रियेत स्वच्छता आणि अन्नसुरक्षेच्या निकषांचे काटेकोर पालन करण्यावर भर देण्यात आला आहे.

**विद्यार्थ्यांना सुरक्षित आणि पौष्टिक आहार देण्यावर भर**

महापौर रवि लांडगे म्हणाले की, विद्यार्थ्यांचे आरोग्य, पोषण आणि शिक्षण यांचा जवळचा संबंध आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षणासोबतच विद्यार्थ्यांना स्वच्छ, सकस आणि पौष्टिक आहार मिळणे ही महापालिकेची जबाबदारी आहे. शहरातील सुमारे ५७ हजार विद्यार्थ्यांना नियमित पोषण आहार उपलब्ध करून दिला जात असून, या व्यवस्थेत स्वच्छता, सुरक्षितता आणि गुणवत्तेचा उच्च दर्जा कायम राखणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

विद्यार्थ्यांना मिळणारा प्रत्येक घास सुरक्षित, पौष्टिक आणि गुणवत्तापूर्ण असावा, अशी महापालिकेची भूमिका असून, विद्यार्थ्यांच्या शारीरिक व बौद्धिक विकासासाठी योग्य पोषण आवश्यक आहे. त्यामुळे भविष्यातही विद्यार्थीकेंद्री शैक्षणिक आणि पोषणविषयक




सुविधांना प्राधान्य दिले जाईल, असे लांडगे यांनी नमूद केले.

**आमदार श्रीकांत भारतीय यांचे सहकार्य**

अद्ययावत केंद्रीय स्वयंपाकगृहासाठी आवश्यक जागा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने मार्गदर्शक तथा आमदार श्रीकांत भारतीय यांचे विशेष सहकार्य लाभले. त्यांच्या सहकार्यामुळे विद्यार्थ्यांच्या शालेय पोषण आहारासाठी आधुनिक आणि अधिक सक्षम व्यवस्था उभारण्यास मदत झाल्याचे महापालिका प्रशासनाने सांगितले.

शालेय पोषण आहार हा विशेषतः आर्थिकदृष्ट्या गरजू कुटुंबांतील विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने महत्त्वाचा घटक आहे. त्यामुळे केवळ आहाराचे वितरण न करता त्याची गुणवत्ता, स्वच्छता, सुरक्षितता आणि पौष्टिकता सातत्याने सुनिश्चित करणे आवश्यक आहे. याच उद्देशाने केंद्रीय स्वयंपाकगृहाचे आधुनिकीकरण करण्यात आले आहे.

उद्घाटन समारंभास महाराष्ट्राचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, इस्कॉनचे आध्यात्मिक गुरु गौरांग प्रभू, आमदार श्रीकांत भारतीय, अमित गोरखे, भाजपा प्रदेश सरचिटणीस राजेश पांडे, नगरसेविका सारिका मासुळकर यांच्यासह अन्नामृत फाउंडेशनचे पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

अद्ययावत स्वयंपाकगृहामुळे मोठ्या प्रमाणावर पोषण आहार तयार करण्याची क्षमता, स्वच्छता व अन्नसुरक्षा व्यवस्थापन तसेच विद्यार्थ्यांपर्यंत वेळेत गुणवत्तापूर्ण आहार पोहोचविण्याची प्रक्रिया अधिक सक्षम होणार आहे. त्यामुळे शहरातील हजारो विद्यार्थ्यांच्या आरोग्यपूर्ण भविष्यासाठी सुरू असलेल्या प्रयत्नांना या सुविधेमुळे आणखी बळ मिळणार आहे.

## निर्माल्यापासून सुगंधी धूप-अगरबत्ती निर्मिती प्रकल्पाची उपमहापौर शर्मिला बाबर यांच्याकडून पाहणी

### दररोज सुमारे ५०० किलो निर्माल्यावर प्रक्रिया; महिला बचत गटांना रोजगाराची संधी

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**
**पिंपरी-चिंचवड : प्रतिनिधी**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरात मोठ्या प्रमाणात निर्माण होणाऱ्या निर्माल्याचे पर्यावरणपूरक व्यवस्थापन करण्यासाठी दापोडी येथील निर्माल्यापासून सुगंधी धूप व अगरबत्ती निर्मिती प्रकल्पाची उपमहापौर शर्मिला बाबर यांनी पाहणी केली. यावेळी त्यांनी प्रकल्पाची प्रक्रिया जाणून घेतली तसेच येथे कार्यरत महिलांशी संवाद साधून त्यांच्या कामकाजाची आणि अडचणींची माहिती घेतली.

पिंपरी–चिंचवड शहरातील विविध धार्मिक स्थळे आणि परिसरातून दररोज सुमारे ५०० किलो निर्माल्य संकलित केले जाते. या निर्माल्यावर आवश्यक प्रक्रिया करून त्यापासून सुगंधी धूप व अगरबत्ती तयार केली जाते. त्यामुळे निर्माल्याची योग्य पद्धतीने विल्हेवाट लावण्यास मदत होत असून, त्याचा पुनर्वापर करून उपयुक्त उत्पादने तयार केली जात आहेत.

> निर्माल्यापासून सुगंधी धूप व अगरबत्ती तयार करून त्याचा पुनर्वापर केला जात आहे. त्यामुळे पर्यावरण संवर्धनासोबतच महिला बचत गटांना रोजगाराची संधी मिळत आहे. नागरिकांनी या पर्यावरणपूरक उपक्रमाला सहकार्य करावे.
> **- शर्मिला बाबर, उपमहापौर, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका**

पिंपरी–चिंचवड महानगरपालिका आणि चार महिला बचत गटांच्या माध्यमातून हा प्रकल्प राबविण्यात येत आहे. निर्माल्य व्यवस्थापनासोबतच या प्रकल्पामुळे महिला बचत गटांना रोजगाराची संधी उपलब्ध झाली असून, महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणालाही चालना मिळत आहे.



पाहणीदरम्यान उपमहापौर बाबर यांनी निर्माल्य संकलन, त्यावर करण्यात येणारी प्रक्रिया, धूप–अगरबत्ती निर्मिती तसेच महिलांना मिळणाऱ्या रोजगाराच्या संधींबाबत माहिती घेतली. गणेशोत्सवाच्या काळात मोठ्या प्रमाणात निर्माल्य निर्माण होते. हे निर्माल्य नदी, नाले किंवा इतर जलस्रोतांमध्ये टाकल्यास पर्यावरणाची हानी होऊ शकते. त्यामुळे नागरिकांनी निर्माल्य नदीत अथवा इतरत्र न टाकता महापालिकेच्या निर्माल्य संकलन व्यवस्थेकडे द्यावे, असे आवाहन उपमहापौर शर्मिला बाबर यांनी केले.

यावेळी सहाय्यक आरोग्य निरीक्षक राजेश भाट, अंकुश झिटे, मुख्य आरोग्य निरीक्षक उद्धव डवरी, आरोग्य निरीक्षक ओंकार शिवरकर, प्रभारी आरोग्य निरीक्षक उमेश जाधव, समाज विकास विभागाच्या समूह संघटिका वैशाली लगडे, योजक संस्थेच्या सिनिअर मॅनेजर सेजल जोशी यांच्यासह प्रकल्पात कार्यरत महिला उपस्थित होत्या. .

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स ॲण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

# गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मंचर पोलिसांची दंगा काबू रंगीत तालीम

■ दैनिक राज्य लोकतंत्र
मंचर । प्रतिनिधी

आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी मंचर पोलिसांकडून गुरुवारी (दि. १०) जातीय दंगा काबू योजनेची रंगीत तालीम घेण्यात आली. मंचर शहरातील क्रीडा संकुलात दुपारी ३ ते ४ या वेळेत झालेल्या या प्रात्यक्षिकात पोलीस अधिकारी, अंमलदार, आरसीपी पथक आणि रुग्णवाहिकेचा सहभाग होता.

प्रभारी पोलीस निरीक्षक महादेव वाघमोडे यांच्या माहितीनुसार, गणेशोत्सव काळात मिरवणुका, सार्वजनिक कार्यक्रम आणि विविध मंडळांच्या उपक्रमांमुळे मोठ्या प्रमाणावर गर्दी होते. या काळात





संभाव्य तणावपूर्ण परिस्थिती, जमाव नियंत्रण आणि अचानक निर्माण होणाऱ्या कायदा-सुव्यवस्थेच्या परिस्थितीला प्रभावीपणे सामोरे जाण्यासाठी पोलिसांची तयारी तपासण्यात आली.

या रंगीत तालीममध्ये एक पोलीस निरीक्षक, दोन पोलीस अधिकारी आणि २२ पोलीस अंमलदारांसह एक आरसीपी पथक सहभागी झाले होते. आपत्कालीन परिस्थितीत तातडीने वैद्यकीय मदत मिळावी यासाठी रुग्णवाहिकाही तैनात करण्यात आली होती.

तालीमदरम्यान जमाव नियंत्रण, प्रतिबंधात्मक उपाययोजना तसेच परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी आवश्यक विविध प्रक्रियांचे प्रात्यक्षिक करण्यात आले. यावेळी दोन टिअर गॅस सेल आणि दोन हँड ग्रेनेड फायर करण्यात आले.

गणेशोत्सव शांततेत पार पडावा आणि कोणत्याही अनुचित घटनेला तातडीने प्रतिसाद देता यावा, यासाठी पोलिसांच्या समन्वयाची आणि आपत्कालीन प्रतिसाद क्षमतेचीही चाचणी घेण्यात आली. या रंगीत तालीममुळे प्रत्यक्ष परिस्थितीत पोलिस दलाची कार्यक्षमता तपासण्यास मदत झाली असून, गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मंचर पोलीस प्रशासन सज्ज असल्याचे दिसून आले.

## सारांश वृत्त

### पुणे फेस्टिव्हलतर्फे शनिवारी ढोल-ताशांच्या गजरामध्ये रंगणार 'मंगलाचरण सोहळा'

■ दैनिक राज्य लोकतंत्र
पुणे । प्रतिनिधी

विविध सांस्कृतिक कार्यक्रमांची पर्वणी असलेल्या यंदाच्या पुणे फेस्टिव्हलतर्फे शनिवार दिनांक १२ सप्टेंबर रोजी सकाळी ११.०० वाजता अलका चौकात आगळावेगळा असा 'मंगलाचरण सोहळा' रंगणार आहे. यामध्ये, शिवमुद्रा ढोल पथकाचे स्थिर वादन होणार असून पुणे फेस्टिव्हलचे बोधचिन्ह असलेली भव्य रांगोळी रेखाटण्यात येणार आहे, अशी माहिती पुणे फेस्टिव्हल २०२६ चे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल यांनी आज आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी बोलताना कृष्णकुमार गोयल म्हणाले की, कोणत्याही शुभ कार्याची सुरुवात करताना ईश्वराकडे कल्याण आणि मंगलतेची प्रार्थना केली जाते, त्याला मंगलाचरण म्हणतात. यंदाच्या गणेशोत्सवानिमित्त पुणे फेस्टिव्हल तर्फे हा आगळावेगळा 'मंगलाचरण सोहळा' आयोजित करण्यात आला आहे.

या वेळी पुणे फेस्टिव्हलचे जनरल सेक्रेटरी डॉ. सतीश देसाई, खासदार मेधा कुलकर्णी, महसूल राज्यमंत्री माधुरी मिसाळ, पुण्याच्या महापौर मंजुषा नागपुरे, पुण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पुणे महानगरपालिका आयुक्त नवल किशोर राम, पुणे शहर पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्यासह पुण्यातील मानाचे पाच गणपती आणि श्रीमंत दगडूशेठ हलवाई ट्रस्ट गणेशोत्सव मंडळ व अखिल मंडई गणेशोत्सव मंडळांचे अध्यक्ष यांना आमंत्रित करण्यात आले आहे. तसेच पारंपारिक वेशभूषेतील कलाकार, पुणे शहराच्या विविध क्षेत्रांतील प्रतिष्ठीत मान्यवर, विविध संस्थांचे पदाधिकारी आणि पुणेकर गणेशभक्त उपस्थित राहणार आहेत, असेही कृष्णकुमार गोयल यांनी यावेळी सांगितले.

# आंबेगाव–शिरूरमधील प्रलंबित सिंचन प्रकल्पांसह दूध भेसळ प्रकरणावर चर्चा

■ दैनिक राज्य लोकतंत्र
मंचर : प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी–शरदचंद्र पवार पक्षाचे पुणे जिल्हाध्यक्ष देवदत्त निकम यांनी शुक्रवारी पुणे येथे पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा माजी केंद्रीय कृषिमंत्री शरदचंद्र पवार यांची भेट घेतली. या भेटीत आंबेगाव–शिरूर विधानसभा मतदारसंघातील प्रलंबित विकासकामे, सिंचन प्रकल्प तसेच आंबेगाव तालुक्यातील दूध भेसळ प्रकरणावर सविस्तर चर्चा करण्यात आली.



मतदारसंघातील डिंभे–माणिकडोह बोगदा, आदिवासी भागातील उपसा सिंचन योजना, कळमोडी प्रकल्प, म्हाळसाकांत योजना आणि थिटेवाडी धरण यांसह विविध सिंचन प्रकल्प प्रलंबित आहेत. या प्रकल्पांना गती मिळाल्यास शेतकरी, आदिवासी बांधव आणि सर्वसामान्य नागरिकांना मोठा फायदा होऊ शकतो. त्यामुळे संबंधित प्रकल्प मार्गी लावण्यासाठी शासनस्तरावर पाठपुरावा करण्याची मागणी निकम यांनी पवार यांच्याकडे केली.

### दूध भेसळीचा मुद्दाही पवारांच्या निदर्शनास

आंबेगाव तालुक्यात उघडकीस आलेल्या दूध भेसळ प्रकरणाची माहितीही निकम यांनी शरद पवार यांना दिली. दूध भेसळीमुळे नागरिकांच्या आरोग्याचा गभीर प्रश्न निर्माण होऊ शकतो. त्यामुळे या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली.

जनतेच्या आरोग्याशी संबंधित या प्रकरणाच्या मुळापर्यंत जाऊन संबंधित यंत्रणांनी कठोर पावले उचलावीत आणि दोषींवर कोणतीही दयामाया न दाखवता कारवाई व्हावी, यासाठी पवार यांनी लक्ष घालावे, अशी विनंती निकम यांनी केली.

या भेटीत मतदारसंघातील विविध विकासकामे, सिंचनाचे प्रश्न आणि जनतेच्या इतर समस्या यावरही चर्चा झाल्याचे सांगण्यात आले.

# कात्रज-कोंढवा रस्त्यावरील बळींवरून महापालिका सभेत विरोधक आक्रमक; जोरदार घोषणाबाजी

■ दैनिक राज्य लोकतंत्र
पुणे : प्रतिनिधी


कात्रज-कोंढवा रस्त्यावर झालेल्या अपघातातील बळींच्या निषेधार्थ काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) या विरोधी पक्षांच्या नगरसेवकांनी पुणे महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत आज जोरदार घोषणाबाजी केली. या रस्त्यावरील अपघातांसाठी महापालिका प्रशासनाला जबाबदार धरत 'प्रशासनाचा धिक्कार असो', 'कारवाई झालीच पाहिजे', 'न्याय द्या, न्याय द्या', 'चिमुकलीला न्याय द्या', अशा घोषणा देत नगरसेवकांनी प्रशासनाचा निषेध केला. कात्रज-कोंढवा रस्त्यावर नुकताच १२ वर्षीय चिमुकलीचा बळी गेला असून, आतापर्यंत या रस्त्यावर २१ जणांचा मृत्यू झाल्याचे सभेत सांगण्यात आले. मुख्य शहर अभियंता अनिरुद्ध पावसकर यांनी प्रशासनाची बाजू मांडताना ताब्यात आलेल्या जागेनुसार रस्त्याचे काम करण्यात आल्याचे सांगितले. अद्याप १० जागामालकांचे भूसंपादन बाकी असून, येत्या सहा महिन्यांत हा रस्ता पूर्ण करण्याचे नियोजन असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या वेळी बाबुराव चांदेरे यांनी २०१२ मध्ये आपण स्थायी समितीचे अध्यक्ष असताना पीपीपी मॉडेलवर रस्ता झाला असता, तर आजची परिस्थिती उद्भवली नसती, असे सांगितले. या परिसरात तीन पोलिस ठाणी असून, शाळांच्या बसही रस्त्यावर उभ्या राहत असल्याने वाहतुकीचा प्रश्न गंभीर आहे. समृद्धी महामार्ग सुरू झाला; मात्र कात्रज-कोंढवा रस्ता अद्याप पूर्ण झालेला नाही, अशी खंतही व्यक्त करण्यात आली.

अरविंद शिंदे यांनी या रस्त्यासाठी ३९५ कोटी रुपयांचे भूसंपादन करण्यात आले असून, गेल्या १२ वर्षांपासून रस्ता रखडल्याचे सांगितले. प्रशासन आणखी किती बळी गेल्यानंतर जागे होणार, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. दिलीप वेडे पाटील यांनी १२ आणि १८ मीटरचे रस्ते पूर्ण झाल्यास नागरिकांना दिलासा मिळेल, असे सांगितले. हा रस्ता २३ गावांमधून जात असून, येथे सातत्याने छोटे-मोठे अपघात होत असल्याचे त्यांनी नमूद केले. गफूर पठाण यांनी कोंढवा परिसरातील मूलभूत समस्या अद्याप कायम असल्याचे सांगत रस्ते, पाणी, ड्रेनेज, शिक्षण आणि आरोग्याच्या सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी केली.

# पावसाने दडी मारली; कमी पाण्यातही कांदा लागवडीवर शेतकऱ्यांचा भर

■ दैनिक राज्य लोकतंत्र
मंचर : प्रतिनिधी

आंबेगाव तालुक्यातील ग्रामीण भागात पावसाने पुन्हा उघडीप दिल्याने खरीप पिकांसमोर पाण्याचे संकट निर्माण झाले आहे. गेल्या काही दिवसांपासून पावसाचा जोर कमी झाल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली असून, उपलब्ध पाण्याचे काटेकोर नियोजन करत अनेक शेतकरी कांदा लागवडीला प्राधान्य देत आहेत. कमी पाण्यात कांद्याचे पीक घेण्याचा प्रयत्न सुरू असून, शेतकऱ्यांचे डोळे आता आकाशाकडे लागले आहेत.



तालुक्यातील विविध गावांमध्ये कांदा लागवडीची लगबग सुरू आहे. कांदा हे नगदी पीक असल्याने बाजारभाव चांगला मिळाल्यास आर्थिक उत्पन्नाची अपेक्षा शेतकऱ्यांना असते. त्यामुळे पाण्याची उपलब्धता मर्यादित असतानाही अनेक शेतकरी कांदा लागवडीचा धोका पत्करत आहेत. विहिरी, कूपनलिका आणि उपलब्ध सिंचन साधनांच्या माध्यमातून पाणी देत रोपांची लागवड केली जात आहे.

मात्र, पावसाची उघडीप आणखी वाढल्यास कांदा पिकाच्या वाढीवर परिणाम होण्याची शक्यता आहे. लागवडीनंतर सुरुवातीच्या काळात पिकाला आवश्यक ओलावा मिळणे महत्त्वाचे असल्याने पाऊस लांबल्यास सिंचनाचा अतिरिक्त खर्च शेतकऱ्यांना सहन करावा लागू शकतो. बियाणे, रोपे, मजुरी, खते, औषधे आणि मशागतीचे वाढलेले दर पाहता उत्पादन खर्चात आणखी वाढ होण्याची भीती व्यक्त होत आहे.

### पावसाच्या प्रतीक्षेत शेतकरी

कांदा लागवडीबरोबरच तालुक्यातील इतर खरीप पिकांनाही पावसाची गरज आहे. काही भागांत जमिनीतील ओलावा कमी होऊ लागल्याने पिकांची वाढ मंदावण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे आगामी काही दिवसांत दमदार पाऊस पडावा, अशी शेतकऱ्यांची अपेक्षा आहे.

उपलब्ध पाण्याचा जपून वापर करून कांदा लागवड केली आहे. पुढील काही दिवसांत चांगला पाऊस झाला तर पिकाला मोठा फायदा होईल. मात्र, पाऊस लांबल्यास सिंचनाचा खर्च वाढणार आहे, अशी प्रतिक्रिया परिसरातील शेतकऱ्यांनी व्यक्त केली.

दरम्यान, कांदा लागवडीचे क्षेत्र वाढत असताना भविष्यात बाजारात कांद्याची आवक वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे उत्पादनासोबतच बाजारभावाचीही चिंता शेतकऱ्यांना सतावत आहे. सध्या मात्र पावसाने दडी मारल्याने पीक वाचविण्यासाठी उपलब्ध पाण्याचे नियोजन करण्याची धावपळ शेतकऱ्यांना करावी लागत आहे.

# नाणेघाटात हेरिटेज क्लबच्या विद्यार्थ्यांची स्वच्छता मोहीम

■ दैनिक राज्य लोकतंत्र
मंचर : प्रतिनिधी

रयत शिक्षण संस्थेच्या अण्णासाहेब आवटे महाविद्यालयातील इतिहास विभागांतर्गत कार्यरत हेरिटेज क्लबच्या विद्यार्थ्यांनी नाणेघाट परिसरात स्वच्छता मोहीम राबवून ऐतिहासिक वारसा जतनाचा संदेश दिला. ऐतिहासिक स्थळांचे संवर्धन आणि विद्यार्थ्यांमध्ये वारशाबाबत जागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

मोहिमेदरम्यान विद्यार्थ्यांनी नाणेघाट परिसराची पाहणी करून प्लास्टिक कचरा, पाण्याच्या बाटल्या, प्लास्टिक पिशव्या आणि इतर टाकाऊ साहित्य गोळा केले. परिसर स्वच्छ करून ऐतिहासिक स्थळाचे सौंदर्य व महत्त्व जपण्यासाठी विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.



नाणेघाट हा सातवाहनकालीन व्यापारी मार्ग, प्राचीन शिलालेख आणि ऐतिहासिक अवशेषांमुळे महाराष्ट्राच्या इतिहासातील महत्त्वाचा वारसा परिसर आहे. अशा स्थळांचे जतन ही केवळ शासन किंवा पुरातत्त्व विभागाची जबाबदारी नसून नागरिकांचीही सामूहिक जबाबदारी आहे, असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन. एस. गायकवाड यांनी विद्यार्थ्यांच्या उपक्रमाचे कौतुक केले. इतिहासाचा अभ्यास केवळ पाठ्यपुस्तकांपुरता मर्यादित न ठेवता विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष ऐतिहासिक स्थळांना भेट देऊन त्यांच्या जतन–संवर्धनासाठी पुढाकार घ्यावा, असे त्यांनी सांगितले.

या उपक्रमासाठी इतिहास विभागप्रमुख प्रा. रविंद्र पारधी, प्रा. राहुल सरोदे आणि प्रा. मोनाली टेमकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

स्वच्छता मोहिमेत पल्लवी पोटकुळे, अश्विनी वायाळ, निशा कुडेकर, साक्षी सारोक्ते, स्वप्नाली असवले, रेखा डामसे, दिव्या मेंगाळ, अंकिता बांबळे, वैशाली केंगले, गौरी शेळके, मयुर शिंगाडे, अपेक्षा हिले, राहुल कारोटे, आदित्य असवले, सुमित लोहकरे, आनंद मडके, ओंकार मेमाणे, रोहित केंगले, आदित्य मेमाणे, हर्षल कवटे, दिग्विजय कारोटे आणि अमित वाबळे या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

### प्रत्यक्ष कृतीतून इतिहासाची आस्था

हेरिटेज क्लबच्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना ऐतिहासिक वारसा स्थळांचे महत्त्व प्रत्यक्ष अनुभवता आले. स्वच्छता आणि संवर्धनाच्या माध्यमातून इतिहास व स्थानिक वारशाबद्दल आस्था निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. भविष्यातही अशा उपक्रमांत सातत्य ठेवण्याचा संकल्प विद्यार्थ्यांनी व्यक्त केला.

# ५ कोटींची खंडणी मागणाऱ्या टोळीला पिंपरी–चिंचवड पोलिसांचा दणका; २५ लाखांची रोकड स्वीकारताना चौघे गजाआड!

■ दैनिक राज्य लोकतंत्र
पिंपरी-चिंचवड : प्रतिनिधी

पिंपरी–चिंचवड शहरातील औद्योगिक क्षेत्रात उद्योजक, व्यावसायिक, कामगार तसेच विविध आस्थापनांना धमकावून खंडणी उकळण्याचा प्रयत्न करणाऱ्यांविरुद्ध पिंपरी–चिंचवड पोलिसांनी कठोर भूमिका घेतली आहे. एमआयडीसी भोसरी परिसरातील एका खासगी कंपनीच्या प्रतिनिधींना माहिती अधिकाराचा धाक दाखवत तसेच कंपनीची कागदपत्रे काढल्याचे सांगून आणि जीवे मारण्याची धमकी देत तब्बल ५ कोटी रुपयांची खंडणी मागणाऱ्या चौघांना २५ लाख रुपये स्वीकारताना सापळा रचून अटक करण्यात आली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी मागील सुमारे सहा महिन्यांपासून कंपनीच्या प्रतिनिधींशी संपर्क साधत होते. कंपनीचे काम योग्य पद्धतीने सुरू नसल्याचे सांगून तसेच महाराष्ट्रात व्यवसाय करायचा असल्यास ५ कोटी रुपये देण्याची मागणी केली जात होती. पैसे न दिल्यास कंपनीची वाट लावण्याची तसेच जीवे मारण्याची धमकीही देण्यात आली होती.

या प्रकाराची गंभीर दखल घेत खंडणीविरोधी पथकाने नियोजनबद्ध पद्धतीने सापळा रचला. आरोपी कंपनीच्या प्रतिनिधींना भेटण्यासाठी आले असता खंडणीच्या रकमेबाबत चर्चा झाली. त्यानंतर आरोपी राहुल प्रेमनारायण मिश्रा याने फिर्यादीकडून २५ लाख रुपये रोख रक्कम काळ्या रंगाच्या बॅगेत स्वीकारली. यावेळी पोलिसांनी कारवाई करत चौघांना ताब्यात घेतले.

याप्रकरणी एमआयडीसी भोसरी पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ६१३/२०२६ दाखल करण्यात आला असून भारतीय न्याय संहिता (इछड) २०२३ मधील कलम ३०८(३), ३०८(४), ३०८(५) व ३(५) अन्वये कारवाई करण्यात आली आहे.

अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे राहुल प्रेमनारायण मिश्रा (वय ३८), अल्ताफ उस्मान जानवेकर (वय ५३), रमेश भिमा मांजरेकर (वय ३९) आणि सुनील राजेंद्र कानू (वय ३५) अशी आहेत. आरोपी सुनील कानू याच्या ताब्यातील मारुती सुझुकी एक्सएल-६ या वाहनातून आरोपी फिर्यादीकडे आले होते, अशी माहिती पोलिसांनी दिली.

औद्योगिक परिसरातील उद्योजक, व्यावसायिक किंवा आस्थापनांवर दबाव आणणे, पैसे मागणे, धमकी देणे, जबरदस्ती करणे किंवा दहशत निर्माण करून खंडणी वसूल करण्याचा प्रयत्न करणे कोणत्याही परिस्थितीत सहन केला जाणार नाही, असा स्पष्ट इशारा पिंपरी-चिंचवड पोलिसांनी दिला आहे. गुन्ह्याचे गांभीर्य, आरोपींची भूमिका आणि उपलब्ध पुराव्यांच्या आधारे भारतीय न्याय संहिता व इतर लागू कायद्यांमधील कठोर कलमांनुसार गुन्हे दाखल करून प्रभावी तपास करण्यात येणार आहे. तसेच गुन्ह्यामागील मुख्य सूत्रधार, प्रत्यक्ष खंडणी मागणारे, मध्यस्थ तसेच आरोपींना मदत करणाऱ्या व्यक्तींची भूमिका तपासून त्यांच्यावरही कायदेशीर कारवाई केली जाईल.

औद्योगिक विकासाला अडथळा आणणारी कोणतीही गुन्हेगारी प्रवृत्ती खपवून घेतली जाणार नाही, असा स्पष्ट संदेश पोलिसांनी दिला आहे. उद्योजक व व्यावसायिकांनी कोणत्याही दबावाला किंवा धमकीला बळी न पडता अशा घटनांची तात्काळ पोलिसांना माहिती द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. तक्रारदार तसेच माहिती देणाऱ्या व्यक्तींच्या सुरक्षेला प्राधान्य देण्यात येणार असल्याचेही पोलिसांनी स्पष्ट केले. ही कारवाई पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे, सह पोलीस आयुक्त डॉ. शशिकांत महावरकर, अपर पोलीस आयुक्त सारंग आव्हाड, पोलीस उपायुक्त (गुन्हे) रोहिदास पवार आणि सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे-२) सचिन कदम यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

खंडणीविरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील, श्रेणी पोलीस उपनिरीक्षक रमेश गायकवाड तसेच पोलीस अंमलदार अभिमन्यू बनसोडे, सुनील कानगुडे, किशोर कांबळे, प्रदीप पोटे, किरण जाधव, चंद्रकांत जाधव, प्रदीप गोडांबे आणि दादाभाऊ साबळे यांच्या पथकाने ही कारवाई केली.

## सारांश वृत्त

### चाकण–निगडी मेट्रो मार्गिकेत आळंदी स्थानकाचा समावेश करा

■ दैनिक राज्य लोकतंत्र
पिंपरी-चिंचवड : वृत्तसंस्था

पुणे येथे जिल्हा विकास समन्वय व सनियंत्रण (दिशा) समितीची बैठक केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या अध्यक्षतेखाली झाली. त्यात पिंपरी-चिंचवडचे महापौर रवी लांडगे यांनी शहराच्या विकासाच्या दृष्टीने प्रश्न मांडले. शहरातील पायाभूत सुविधा, सार्वजनिक वाहतूक, नदी प्रदूषण आणि पाणीपुरवठ्याशी संबंधित प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी केंद्र व राज्य शासन स्तरावर आवश्यक सहकार्य व पाठपुरावा करावा, अशी विनंती केली.

प्रस्तावित चाकण–निगडी मेट्रो मार्गिकेमध्ये आळंदी स्थानकाचा समावेश करण्यात यावा, अशी मागणी महापौर लांडगे यांनी बैठकीत केली. त्यासाठी आवश्यक परवानग्या मिळविण्यासह केंद्र शासनाकडून आवश्यक निधी उपलब्ध होण्यासाठी पाठपुरावा करावा, अशी विनंती केली.

इंद्रायणी नदीच्या प्रदूषणावर नियंत्रण आणण्यासाठी नदीक्षेत्राशी संबंधित सर्व महापालिका, स्थानिक स्वराज्य संस्था, शासकीय यंत्रणा व संबंधित प्राधिकरणांनी स्वतंत्रपणे कार्यवाही करण्याऐवजी परस्पर समन्वयातून ठोस आणि कालबद्ध कृती आराखडा तयार करावा. प्रदूषणाची कारणे निश्चित करून सांडपाणी प्रक्रिया, प्रदूषण नियंत्रण आणि नदी संवर्धनाच्या उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या सूचना संबंधित यंत्रणांना द्याव्यात, अशी मागणी केली.

# लडाखला राज्याचा दर्जा नाही, विधानसभाही नाही; मग हा ‘विशेष’ प्रयोग नेमका कशासाठी?

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली / वृत्तसंस्था

लडाखला राज्याचा दर्जा देण्याची मागणी आणि केंद्रशासित प्रदेशाला विधानसभा देण्याची मागणी फेटाळून लावत केंद्र सरकारने आता एक नवा पर्याय पुढे केला आहे. लडाखचे मुख्य सचिव आशिष कुंद्रा यांनी स्पष्ट केले आहे की, लडाखला ना राज्याचा दर्जा मिळणार आहे, ना विधानसभेसह केंद्रशासित प्रदेशाचा दर्जा. त्याऐवजी संविधानाच्या चौकटीत एक स्वतंत्र आणि देशात कुठेही अस्तित्वात नसलेली ‘सुई जेनेरिस’ म्हणजेच अनोखी रचना तयार केली जाणार आहे.

गृहमंत्रालय आणि लडाखमधील **Ladakh Apex Body (LAB)** तसेच **Kargil Democratic Alliance (KDA)** यांच्या बैठकीत या प्रस्तावित व्यवस्थेवर चर्चा झाली. या नव्या संस्थेला विधायी, कार्यकारी आणि आर्थिक अधिकार देण्याचे सांगितले जात आहे. मात्र या संस्थेचे स्वरूप काय असेल, तिच्या प्रमुखाला कोणते पद दिले जाईल आणि प्रत्यक्ष अधिकारांची मर्यादा किती असेल, याबाबत अद्याप अंतिम स्पष्टता नाही.

यामुळे लडाखमधील असंतोष संपण्याऐवजी नवे प्रश्न निर्माण झाले आहेत. स्थानिक नेत्यांनी या बैठकीवरच नाराजी व्यक्त करत ती ‘वेळ आणि पैशाचा अपव्यय’ असल्याचे म्हटले आहे. केंद्रातील गृहमंत्रालय आणि लडाख प्रशासन यांच्यातच एकमत नसल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

लडाखला २०१९ मध्ये जम्मू-काश्मीरपासून वेगळे करून स्वतंत्र केंद्रशासित प्रदेशाचा दर्जा देण्यात आला. त्यानंतर स्थानिक पातळीवर अधिक राजकीय प्रतिनिधित्व, जमीन-संसाधनांचे संरक्षण आणि निर्णयप्रक्रियेत अधिकार यासाठी आंदोलन सुरू आहे.

आता केंद्र सरकार ‘राज्यही नाही आणि विधानसभा असलेला केंद्रशासित प्रदेशही नाही’ अशी तिसरीच रचना आणण्याच्या तयारीत आहे. अधिकार दिल्याचा दावा केला जात असला, तरी त्या अधिकारांवर अंतिम नियंत्रण कोणाचे राहणार, हा लडाखच्या जनतेसमोरील सर्वात मोठा प्रश्न आहे. नवीन नाव आणि नवीन रचना जाहीर करून लोकशाही प्रतिनिधित्वाचा प्रश्न सुटत नाही; त्यासाठी अधिकारांची घटनात्मक हमी आणि प्रत्यक्ष स्वायत्तता आवश्यक आहे.

## तेल महागले, रुपया कोसळला; अर्थव्यवस्थेच्या ‘मजबूत’ दाव्यांना पुन्हा धक्का!

■ दैनिक राज्य लोकतंत्र
मुंबई : प्रतिनिधी

आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या दराने शंभर डॉलरचा टप्पा गाठण्याच्या दिशेने वाटचाल सुरू करताच भारतीय रुपयाला त्याची मोठी किंमत मोजावी लागली आहे. शुक्रवारी, ११ सप्टेंबर रोजी रुपया ९५.५५ प्रति डॉलरवर बंद झाला. दिवसअखेर त्यात ०.१ टक्क्यांची घसरण झाली, तर संपूर्ण आठवड्यात रुपया तब्बल १.१ टक्क्यांनी कमजोर झाला. मे महिन्याच्या मध्यापासूनची ही रुपयाची सर्वात मोठी साप्ताहिक घसरण ठरली.

रुपयाच्या घसरणीमागे कच्च्या तेलाच्या वाढत्या किमती हा प्रमुख दबाव आहे. तेलाच्या किमती आठवड्याच्या अखेरीस प्रति पिंप १०० डॉलरच्या वर राहण्याची शक्यता निर्माण झाली आहे. भारत आपल्या गरजेच्या मोठ्या प्रमाणातील कच्च्या तेलाची आयात करतो. त्यामुळे तेल महागले की डॉलरची मागणी वाढते, आयात खर्च फुगतो आणि रुपयावर थेट दबाव येतो.

ही परिस्थिती केवळ चलन बाजारापुरती मर्यादित नाही. रुपया कमजोर झाला की पेट्रोलियम पदार्थ, वाहतूक, औद्योगिक कच्चा माल आणि आयातीत वस्तूंच्या खर्चावर परिणाम होऊ शकतो. त्यातून महागाईचा दबाव पुन्हा वाढण्याची शक्यता निर्माण होते.

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या हस्तक्षेपामुळे रुपयाची घसरण काही प्रमाणात रोखली गेली असली, तरी प्रश्न कायम आहेरुपयाला वारंवार हस्तक्षेपाच्या आधारावरच सावरावे लागणार आहे का?

जागतिक तेल बाजारातील तणाव, आखाती संघर्ष आणि सामुद्रधुनीतील वाहतुकीवरील अनिश्चितता वाढत असताना भारतासमोर मोठे आर्थिक आव्हान उभे आहे.

सरकारकडून मजबूत अर्थव्यवस्थेचे दावे केले जात असले, तरी तेलाच्या एका धक्क्याने रुपया इतका हादरतो, ही वस्तुस्थिती दुर्लक्षित करून चालणार नाही. मजबूत अर्थव्यवस्था केवळ आकडेवारीत दिसून उपयोग नाही; बाह्य धक्के सहन करण्याची ताकद चलनात आणि सामान्य नागरिकांच्या खिशातही दिसली पाहिजे.

## बँकांना पाच दिवसांचा आठवडा हवा; सरकारच्या निर्णयशून्यतेचा फटका ग्राहकांना!

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली : प्रतिनिधी

देशभरातील बँकिंग व्यवस्था शुक्रवारी, ११ सप्टेंबर रोजी मोठ्या प्रमाणात विस्कळीत झाली. पाच दिवसांचा कामकाजाचा आठवडा तातडीने लागू करावा आणि प्रलंबित वेतनविषयक प्रश्न सोडवावेत, या मागणीसाठी युनायटेड फोरम ऑफ बँक युनियन्सच्या **(UFBU)** नेतृत्वाखाली देशव्यापी संप पुकारण्यात आला. या संपामुळे विशेषतः सार्वजनिक क्षेत्रातील बँकांच्या बहुतांश शाखा पूर्णपणे किंवा अंशतः बंद राहिल्या.

**UFBU** हे सात बँक कर्मचारी आणि अधिकारी संघटनांचे संयुक्त व्यासपीठ असून, देशातील सुमारे ९० टक्के बँक अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे प्रतिनिधित्व या संघटनांकडून केले जाते. त्यामुळे या आंदोलनाचा परिणाम केवळ बँक कर्मचाऱ्यांपुरता मर्यादित न राहता सामान्य ग्राहकांनाही सहन करावा लागला.




शाखांमधील रोख व्यवहार, धनादेश जमा करणे, पैसे काढणे, कर्जाशी संबंधित प्रक्रिया आणि इतर प्रत्यक्ष बँकिंग सेवा मोठ्या प्रमाणात प्रभावित झाल्या. डिजिटल बँकिंग सेवा काही प्रमाणात सुरू असल्या, तरी शाखांवर अवलंबून असलेल्या ग्राहकांची मोठी गैरसोय झाली.

विशेष म्हणजे खासगी क्षेत्रातील बँकांच्या कामकाजावर या संपाचा परिणाम झाला नाही. त्यामुळे सार्वजनिक क्षेत्रातील बँकांमधील कर्मचारी प्रश्न आणि केंद्र सरकारची भूमिका पुन्हा चर्चेत आली आहे.

पाच दिवसांचा आठवडा ही मागणी अचानक निर्माण झालेली नाही. बँक कर्मचारी संघटना दीर्घकाळापासून या मागणीचा पाठपुरावा करत आहेत. मात्र निर्णय लांबणीवर पडत असल्याने अखेर देशव्यापी संपाचे हत्यार उपसावे लागले.

सरकारकडून डिजिटल बँकिंग, आधुनिक सेवा आणि आर्थिक समावेशनाच्या घोषणा केल्या जात असताना बँक कर्मचाऱ्यांच्या मूलभूत कामकाजाच्या मागण्यांवर तोडगा कधी निघणार? हा प्रश्न आता अधिक तीव्र झाला आहे. बँकिंग व्यवस्था देशाच्या अर्थचक्राचा कणा असेल, तर त्या व्यवस्थेतील कर्मचाऱ्यांचे प्रश्न वारंवार संपाच्या टोकाला पोहोचणे ही केवळ कर्मचारी संघटनांची समस्या नसून प्रशासनाच्या निर्णयप्रक्रियेवरही प्रश्नचिन्ह आहे.

# अखेर सर्वोच्च न्यायालय जागे झाले! आंदोलन दडपण्यासाठी १७ मेट्रो स्थानके बंद का केली?

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली : वृत्तसंस्था

आंदोलन संपल्यानंतर का होईना, अखेर सर्वोच्च न्यायालयाने कॉक्रोच जनता पार्टीच्या आंदोलनादरम्यान मध्य दिल्लीतील १७ मेट्रो स्थानके बंद करण्याच्या निर्णयाची दखल घेतली आहे. १० सप्टेंबर २०२६ रोजी न्यायालयाने केंद्र सरकार, दिल्ली सरकार, दिल्ली पोलीस आणि दिल्ली मेट्रो रेल महामंडळाला नोटीस बजावून उत्तर मागितले.

राष्ट्रीय पात्रता प्रवेश परीक्षेतील २०२६ मधील प्रश्नपत्रिका फुटीच्या आरोपांविरोधात कॉक्रोच जनता पार्टीने आंदोलन केले होते. या आंदोलनाचा दबाव वाढत गेल्यानंतर तत्कालीन शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांना राजीनामा द्यावा लागला. मात्र आंदोलनाच्या काळात प्रशासनाने मेट्रो स्थानके बंद करण्याचा निर्णय घेतल्याने आता कायदा-सुव्यवस्थेच्या नावाखाली नागरिकांच्या हालचालींवर किती मर्यादा घालता येतात, हा मूलभूत प्रश्न सर्वोच्च न्यायालयासमोर आला आहे.

न्यायालयाने स्पष्ट केले आहे की, कार्यकारी सत्तेला निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य असले तरी त्याचा वापर अत्यंत असमप्रमाणात झाल्याचे आढळल्यास न्यायालय हस्तक्षेप करू शकते. त्यामुळे आता सरकारला स्पष्ट करावे लागणार आहे की १७ स्थानके बंद करण्याइतकी परिस्थिती खरोखर गंभीर होती का? त्यासाठी कोणते सुरक्षा मूल्यमापन करण्यात आले होते? आणि सामान्य प्रवाशांना झालेल्या गैरसोयीचा विचार करण्यात आला होता का?

प्रश्न केवळ मेट्रोचा नाही. लोकशाहीत आंदोलन करणे हा नागरिकांचा घटनात्मक अधिकार आहे. सुरक्षेच्या कारणाखाली प्रशासनाला अमर्याद अधिकार देता येणार नाहीत.

मात्र सर्वात मोठा प्रश्न कायम आहेहा निर्णय घेतला जात असताना न्यायालय कुठे होते? आंदोलन झाले, स्थानके बंद झाली, नागरिकांना त्रास झाला आणि आता न्यायालयीन दखल घेतली जात आहे.

उशिरा का होईना, अखेर सर्वोच्च न्यायालय जागे झाले आहे. आता केवळ नोटीस बजावून थांबण्याऐवजी, आंदोलनाच्या नावाखाली नागरिकांच्या अधिकारांवर घातलेल्या मर्यादांची आणि सरकारच्या निर्णयाच्या प्रमाणबद्धतेची ठोस तपासणी होणे गरजेचे आहे.

# रशियाशी मैत्रीचा गजर, अमेरिकन शुल्कांवर मौन; मोदींची परराष्ट्रनीती नेमकी कुठे?

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली : प्रतिनिधी

एकीकडे रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्यासोबत भारत-रशिया संबंध अधिक मजबूत करण्याचा निर्धार, तर दुसरीकडे अमेरिकेच्या शुल्कांचा भारतीय व्यापारावर वाढता दबावया दोन टोकांच्या कात्रीत भारताची परराष्ट्र आणि आर्थिक नीती सापडल्याचे चित्र आहे.

ब्रिक्स शिखर परिषदेच्या पूर्वसंध्येला पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि पुतिन यांची शुक्रवारी पुन्हा भेट झाली. ऊर्जा आणि संरक्षणासह विविध क्षेत्रांतील सहकार्य वाढवण्यावर दोन्ही नेत्यांनी चर्चा केली. मोदी यांनी संघर्ष सोडवण्यासाठी संवाद आणि मुत्सद्देगिरी हाच मार्ग असल्याचेही पुन्हा सांगितले.

पण खरा प्रश्न इथेच आहेरशियाशी संबंध मजबूत करण्याचा निर्धार स्वागतार्ह असेल, तर अमेरिकेच्या वाढत्या शुल्कांपासून भारतीय उद्योग आणि निर्यातदारांचे संरक्षण करण्याची ठोस रणनीती कुठे आहे?

भारत एकाच वेळी अमेरिका, रशिया, आखाती देश, इराण आणि इस्रायल यांच्याशी संबंध सांभाळण्याचा प्रयत्न करीत आहे. मात्र युक्रेन आणि इराणमधील युद्धांमुळे वाहतूक आणि व्यापार विस्कळीत होत असताना भारतीय अर्थव्यवस्थेवरील दबाव वाढत आहे.

मोदी सरकारकडून ‘मजबूत भारत’, ‘जागतिक शक्ती’ आणि ‘मुत्सद्देगिरीचा विजय’ अशा घोषणा केल्या जातात; पण



अमेरिकन शुल्कांचा थेट आर्थिक परिणाम कमी करण्यासाठी नेमकी कृती काय? भारतीय निर्यातदार, उद्योग आणि रोजगार यांच्यासाठी सरकारची ठोस दिशा काय?

रशियाशी जवळीक आणि अमेरिकेशी आर्थिक तणावदोन्ही एकाच वेळी हाताळण्यासाठी स्पष्ट धोरण, ठोस वाटाघाटी आणि आर्थिक तयारी आवश्यक आहे. केवळ नेत्यांच्या भेटी, छायाचित्रे आणि मैत्रीचे गोडवे पुरेसे नाहीत.

# पत्नीची संमती कुठे हरवते? वैवाहिक बलात्कारावर सरकार आणि न्यायव्यवस्थेची कसोटी!

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली : वृत्तसंस्था

: लग्न झाले म्हणून महिलेच्या शरीरावर पतीचा मालकीहक्क निर्माण होतो का? हा प्रश्न केवळ कायद्याचा नाही, तर भारतीय समाजाच्या मानसिकतेचा आणि घटनात्मक मूल्यांचा आरसा आहे. वैवाहिक बलात्काराच्या मुद्द्यावर सर्वोच्च न्यायालयात सुरू असलेल्या सुनावणीत न्यायालयाने केंद्र सरकारला विचारलेला मूलभूत प्रश्न याच ठिकाणी येऊन थांबतोएखाद्या कृत्याला संसदेनं बलात्काराचा गुन्हा मानले नसेल, तर न्यायालय स्वतःहून त्यासाठी फौजदारी खटला चालवण्याचा मार्ग मोकळा करू शकते का?

सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील तीन न्यायमूर्तींच्या खंडपीठासमोर झालेल्या सुनावणीत महिलांच्या संरक्षणाची गरज मान्य करण्यात आली. मात्र घटनात्मक मर्यादेचा प्रश्नही उपस्थित झाला. हीच कायदेशीर गुंतागुंत आज हजारो-लाखो विवाहित महिलांच्या न्यायाच्या प्रश्नाला अडवून उभी आहे.

भारतीय फौजदारी कायद्यात वैवाहिक नात्यातील लैंगिक संबंधांबाबत असलेला अपवाद हा या वादाचा केंद्रबिंदू आहे. म्हणजेच पत्नीची इच्छा नसतानाही पतीने लैंगिक संबंध लादले, तरी प्रत्येक परिस्थितीत त्याला ‘बलात्कार’ या




गुन्ह्याखाली शिक्षा होईलच असे सध्याच्या कायदेशीर चौकटीत नाही.

इथेच सरकारच्या भूमिकेवर कठोर प्रश्न उपस्थित होतात. महिलेची संमती ही विवाहाच्या उंबरठ्यावर संपते का? लग्नपत्रिका हातात आली की स्वतःच्या शरीरावरील निर्णयाचा अधिकार पत्नी गमावते का? जर संमतीला घटनात्मक प्रतिष्ठा आहे, तर वैवाहिक नात्याला तिच्यावर अपवादात्मक अधिकार का?

याचिकाकर्त्यांचा युक्तिवाद स्पष्ट आहेविवाह हा संमतीचा कायमस्वरूपी परवाना नाही. पत्नीला कोणत्याही क्षणी लैंगिक संबंध नाकारण्याचा अधिकार असला पाहिजे. तिच्या इच्छेविरुद्ध लैंगिक संबंध लादले गेले, तर त्याला केवळ ‘वैवाहिक नाते’ म्हणून वेगळ्या नजरेने पाहणे म्हणजे महिलेच्या शारीरिक स्वायत्ततेलाच दुय्यम ठरवणे.

पण दुसरीकडे न्यायालयासमोरही कठीण घटनात्मक मर्यादा आहेत. संसदेने गुन्ह्याची व्याख्या केली नसताना न्यायालय स्वतः नवा फौजदारी गुन्हा निर्माण करू शकते का? हा प्रश्न न्यायालयीन अधिकारक्षेत्राचा आहे. न्यायालयाने कायद्याचा अर्थ लावायचा की कायद्यातील अपवादच रद्द करून नवी फौजदारी जबाबदारी निर्माण करायची, यामध्ये महत्त्वाचा फरक आहे.

म्हणूनच सरकारनेही जबाबदारी झटकून चालणार नाही. जर विद्यमान कायदा महिलांच्या संरक्षणात अपुरा असेल, तर कायदा बदलण्याची जबाबदारी संसद आणि सरकारची आहे. संवेदनशील विषय न्यायालयाच्या दारात ढकलून राजकीय निर्णयापासून पळ काढणे हा कायमचा उपाय होऊ शकत नाही.

आणि न्यायव्यवस्थेसमोरही तितकीच मोठी कसोटी आहे. महिलेची प्रतिष्ठा आणि संमती यांचे घटनात्मक महत्त्व मान्य करताना न्यायालयाने स्वतःच्या अधिकारांच्या सीमाही स्पष्ट ठेवाव्या लागतील.

हा वाद पतीला शिक्षा करण्यापुरता नाही. हा प्रश्न आहेविवाहानंतरही स्त्री स्वतंत्र व्यक्ती आहे का? तिच्या शरीरावर अंतिम अधिकार तिचाच आहे का?

या प्रश्नाचे उत्तर केवळ कायद्याच्या पुस्तकात नव्हे, तर संविधानाच्या समानता, प्रतिष्ठा आणि स्वातंत्र्याच्या मूल्यांत शोधावे लागेल. कारण लग्नाचा अर्थ सहजीवन असू शकतो; मालकीहक्क नाही. आणि संमतीचा अर्थ ‘एकदा हो’ नव्हेप्रत्येक वेळी स्वतंत्र ‘हो’ असतो.